# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक १८/०३/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)** आपत्ती प्राधान्य

**वाचा:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र./करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दिनांक १३/०३/२०२०.

३) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र./करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दिनांक १४/०३/२०२०.

## आदेश

ज्या अर्थी उपरोक्त वाचा क्र. २ चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२०" प्रसिध्द केले असून यातील नियम क्र. ३ नुसार करोना विषाणूमुळे (COVID 19) उदभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन करुन सार्वजनिक ठिकाणी थुंकणे व धुम्रपान करणे यामुळे करोना विषाणू (COVID 19) चा प्रसार व प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे असे पदार्थ विक्री करणारी दुकाने व पानटप-या बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना उपरोक्त वाचा क्र. ३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार करोना विषाणूचा (COVID 19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **जालना जिल्हयामध्ये तंबाखु व तंबाखुजन्य धुम्रपानाचे पदार्थ इ. ची विक्री करणारी सर्व दुकाने / पानटप-या इ. आज दिनांक १८/०३/२०२० रोजी मध्यरात्री १२.०० वाजेपासुन ते ३१/०३/२०२० पर्यंत** बंद ठेवण्यात यावीत असे आदेशित करीत आहे.

या आदेशानुसार तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची दैनंदिन माहिती / अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा.पं. जि.प. जालना, पोलीस उपअधिक्षक (गृह), सहाय्यक आयक्त, अन्न व औषध प्रशासन, जालना, जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा.प्र. जि.अ.का. जालना, सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती व मुख्याधिकारी नगर परिषद/नगर पंचायत जिल्हा जालना यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. ३ मधील "महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२०" चे नियम ११ नुसार, भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

Raut

**(रविंद्र बिनवडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

18/3/2020

प्रत – आवश्यक व माहीतीस्तव कार्यवाहीस्तव

१. जिल्हा पोलीस अधिक्षक, जालना यांना तात्काळ अंमलबजावणीस्तव.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जालना यांना माहितीस्तव.
३. अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, जालना यांना तात्काळ अंमलबजावणीस्तव.
४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा.पं. जि.प. जालना यांना तात्काळ अंमलबजावणीस्तव.
५. सहाय्यक आयक्त, अन्न व औषध प्रशासन, जालना यांना तात्काळ अंमलबजावणीस्तव.
६. तहसीलदार, जालना, बदनापूर, भोकरदन, जाफ्राबाद, परतूर, मंठा, अंबड, घनसावंगी यांना तात्काळ अंमलबजावणीस्तव.
७. गट विकास अधिकारी, जालना, बदनापूर, भोकरदन, जाफ्राबाद, परतूर, मंठा, अंबड, घनसावंगी यांना तात्काळ अंमलबजावणीस्तव.
८. जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा.प्र. जि.अ.का. जालना यांना तात्काळ अंमलबजावणीस्तव.
९. मुख्याधिकारी नगर परिषद/नगर पंचायत जालना, बदनापूर, भोकरदन, जाफ्राबाद, परतूर, मंठा, अंबड, घनसावंगी यांना तात्काळ अंमलबजावणीस्तव.
१०. जिल्हा माहीती अधिकारी, जालना यांना देवुन आदेशीत करण्यात येते की, वरील आदेश वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करावा.

**प्रतिलिपी:-**

१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मत्रालय, मुंबई ३२यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.